# १६ हजार विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाईन परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० च्या परीक्षेंतर्गत सोमवारी १७ हजार ५९ पैकी १६ हजार ७१९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली.

विद्यापीठ परीक्षांना २२ मार्चपासून प्रारंभ झाला आहे. परीक्षा ऑनलाईन-ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येत आहे. सोमवारी बी.एस्सी.-बायोटेक, बी.एस्सी.-आयटी, बी.एस्सी.-शुगर, बी.एस्सी.-संगणकशास्त्र, बीबीए, बीसीएस, बीएसडब्ल्यू, बीआयडी, बीईटीएम, बी.व्होक, एम.ए., बीडीएस, एम.लिब., एमएसडब्लू, एम.कॉम., एमसीए, एम.एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम.एस्सी., बी.एस्सी., बी.ए. अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी दिली.

# विविध २६ परीक्षांसाठी १६७१९ परीक्षार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध १६ पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सोमवारी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील एकूण १६७१९ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली, तर ३४० जण गैरहजर राहिले. या परीक्षेसाठी एकूण १७०५९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. विविध चार सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये बी.एस्सी., बायोटेक, आयटी, शुगरटेक, बीबीए, बीसीए, बीएस्सी, एम.लिब., बीएसडब्ल्यु, बीआयडी, बी.व्होक., एम.कॉम., एमसीए, आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा समावेशाची माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.